MHYA050017452024

आरबीटेशन आर.डी. क्र. ३४८/२०२४
श्रीराम फायनान्स –वि– मो.अकील

**निशाणी क्र. ०९ खाली आदेश**
**दिनांक ०९/०८/२०२४**

प्रस्तुतचा अर्ज धनकोने ऋणको क्र. १ विरुध्द जंगम जप्ती वॉरंट काढण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील कथन असे आहे की, लवाद मामला क्र. १९३७३/२०२२ मधील दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या निवाड्यानुसार थकीत रक्कम रुपये ८८,२७४/– ऋणको यांच्याकडून वसुल करण्याकरीता वारंवार नोटीस पाठविण्यात आली. परंतु ऋणको प्रस्तुत प्रकरणामध्ये निवाड्यामधील नमुद थकीत रक्कम धनको यांना देत नाही किंवा न्यायालयात जमा करीत नाही. सबब, ऋणको यांच्याविरुध्द जंगम जप्ती अधिपत्र पाठविण्यात यावे अशी धनको याची विनंती आहे.

२. संचिकेचे अवलोकन केले. त्यावरुन असे स्पष्ट होत आहे की, ऋणको यास प्रस्तुत प्रकरणाची नोटीस निशाणी क्र. ८ अन्वये तामील झली आहे, परंतु ऋणकोने थकीत रक्कमेचा भरणा केला नाही. वरीष्ठ न्यायालयाकडे सदर निवाड्याच्या नाराजीने अपील किंवा अन्य प्रकारे आव्हान देण्यात आलेले नाही. सदर निवाड्याची अमलबजावणी करु नये असा स्थगनआदेश प्रकरणात पटलावर दाखल केलेला नाही. सबब, सदरच्या रक्कमेच्या वसुलीकरीता ऋणको याची जंगम मालमत्ता जी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे आहे, ती जप्त करणे न्यायोचीत वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. दिवाणी न्याय प्रकिया संहितेचा आदेश २१ नियम ४३ अन्वये ऋणको याचेविरुध्द जंगम जप्ती वॉरंट काढण्यात यावे.

Digitally signed by SAKHARAM NARAYANRAO NAIK
Date: 2024.08.16 10:50:39 +0530

दिनांक ०९/०८/२०२४
ठिकाणः– पुसद.

(एस.एन. नाईक)
दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,
पुसद.